

**पुणे :** पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने कासेवाडी झोपडपट्टीतील नागरिकांसाठी व्यसनमुक्तीच्या विषयी जनजागृती करण्यात आली.

# पंख संस्था, क्विकहिल फाउंडेशनच्या वतीने व्यसनमुक्तीविषयी जनजागृती

**पुणे-** पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फाउंडेशन यांच्या विद्यमाने शालांगन प्रकल्पाच्या अंतर्गत कासेवाडी झोपडपट्टीतील नागरिकांसाठी व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंख या संस्थेतील प्रतिनिधींनी दारूमुक्ती आणि व्यसनमुक्ती या विषयावर पथनाट्य सादर केले, या पथनाट्यामध्ये दारू, सिगारेट, अंमलीपदार्थ यांचे सेवन केल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. नगरसेवक अविनाश बागवे, खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक संभाजी शिर्के, पोलीस अधिकारी भरत चापाईकर आणि कासेवाडी पोलीस चौकीचे पोलीस हवालदार एस. एन. जावळे, पोलीस नाईक घडशी, पोलीस शिपाई पी. एम. भोसले, रफी अहमद किडवाई, उर्दू हायस्कूलच्या मोकाशी यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.